# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in

**( महसूल शाखा )**

---

**वाचले:-** १. द एअर लाईन्स हॉटेल प्रा. लि. १९९, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई- ४०० ०२०. यांचेकडील दि.२४/७/२०१७ रोजीचा अर्ज

२. खान व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७,सुधारणा दि. १९/८/२०१३ मधील नियम ५९.

३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. गौखनि-१०/१००९/प्र.क्र.३०९/ख, दि. ११/०२/२०१०

४. महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग, दि. ११ मे २०१५.

५.परिरक्षण भूमापक, मुंबई शहर यांचेकडील स्थळपाहणी अहवाल दि. २४/८/२०१७

---

**क्र. सीएसएलआर/मशा-२/आ.क्र.२५६७/फोर्ट/भू.क्र. १६३५/गौ.ख.प./२०१७** / 327

**दिनांक** 26 SEP 2017

**विषय : <u>जमीन : मुंबई शहर</u>**
फोर्ट विभागातील भू.क्र.१६३५ या मिळकतीमधून
खोदकाम करुन गौणखनिज उत्खननास परवानगी मिळणेबाबत.

**आदेश :-**

द एअर लाईन्स हॉटेल प्रा. लि. यांनी उपोद्घातातील १ प्रमाणे या कार्यालयास दि. २४/७/२०१७ रोजीचे अर्जाने फोर्ट महसूल विभागातील भू.क्र. १६३५ मुंबई या मिळकतीमधून एकूण **५०० ब्रास** गौणखनिजे काढण्यास परवानगी मागितलेली आहे. अर्जदार यांनी सदर पत्रासोबत लागणारी कागदपत्रे जोडलेली आहे. तसेच त्यांनी **रक्कम रु. २,००,५००/- चा भरणा Online ग्रास प्रणालीने, GRN No-MH ००५००४४६१२०१७१८E दि. ३/९/२०१७ रोजीचे चालान अन्वये** भरणा केलेला आहे. अर्जदार यांनी अर्ज शुल्क र. रु.५००/- चा भरणा स्वामीत्वधनाचे सोबत केलेला आहे.

सबब गौण खनिज काढण्यास सादर केलेल्या कागदपत्रास अनुसरुन द एअर लाईन्स हॉटेल प्रा. लि. यांना वर नमूद जमिनीमधून खोदकाम करुन ५०० ब्रास गौण खनिज (मुरुम, दगड व माती काढणेस) उत्खननास मी श्री. बन्सी गवळी, अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर, खान व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७, सुधारणा दि.१९/८/२०१३ मधील नियम ५९ व महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग, दि. ११ मे २०१५ प्रमाणे मला प्राप्त अधिकारानुसार खालील अटी व शर्तीवर परवानगी देत आहे.

१. या कार्यालयामार्फत देणेत आलेली परवानगी केवळ उत्खननासाठी देणेत आली आहे.
२. या जागेसाठीच्या भाडेपट्टा करारातील अटी व शर्तीचे पालन करणेची जबाबदारी आपली राहील.
३. या जागी करणेत येणाऱ्या कामासाठी भाडेपट्टा करारातील अटी व शर्तीनुसार आवश्यक त्या शासकीय विभागाची परवानगी घेणेची जबाबदारी आपली राहील.
४. सदरचे जमिनीचे खोदकाम करतांना लगतचे जमिनीवरील इमारतीला कोणताही धोका पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबत अर्जदार यांनी या कार्यालयाकडे सादर केलेल्या बंधपत्राचे पालन करावे.

५. खोदकाम केल्यानंतर उत्खननाने निघालेली माती अगर इतर गौणखनिज कोणत्याही शासकीय जमिनीवर टाकण्यात येवू नये. उत्खनन केलेली माती ज्या जागेवर टाकणार आहेत, त्या जागेच्या मालकाची परवानगी घ्यावी. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांची परवानगी घ्यावी.

६. उत्खननाबाबत या आदेशापासून **दोन** महिन्याची मुदत देण्यात येत आहे.

७. मंजूर केलेल्या गौणखनिजापेक्षा जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास दंडनिय कारवाई करण्यात येईल.

८. मुदतीत उत्खनन झाल्याचा अहवाल अर्जदाराने सादर करावा व त्याप्रमाणे या कार्यालयाचे प्रतिनिधिमार्फत प्रमाणित करावे.

९. उत्खनन करण्यास परवानगी दिलेली आहे त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही जागेतून उत्खनन करु नये. तसे आढळल्यास दंडनिय कारवाई करण्यात येईल.

१०. कांदळवनावर भराव केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

११. मुदतीत काम पूर्ण न झाल्यास पुढील मुदतवाढ मिळणार नाही.

(बन्सी गवळी)
अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर

प्रत :-

१. द एअर लाईन्स हॉटेल प्रा. लि., ९९, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई- ४०० ०२०

२. मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहितीसाठी सादर.

३. श्री.गुळसुंदर, अव्वल कारकून, महसूल शाखा,

४. राष्ट्रीय विज्ञान सूचना केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी अग्रेषित.

२/- आपणास यापूर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे आपले पथकामार्फत वरचेवर स्थळपाहणी करुन परवानाधारक यांनी केलेल्या गौणखनिजांचे उत्खननाची मोजमापे घेऊन जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास दंडनिय कार्यवाही करण्यात यावी.